सन २०१५-२०१६ या वित्तीय वर्षा- करीता ७% वन महसूल अनुदानाकरीता दुसरे वितरण" **३६०४ स्थानिक संस्था व पंचायत राज संस्था यांना नुकसान भरपाईच्या व अभिहस्तांकित रकमा देणे. मागणी क्रमांक-एल-५(०१)(१०) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती अधिनियम १९६१ च्या कलम १८१ (अ) अन्वये जिल्हा परिषदाना देय** असलेले ७ टक्के वन महसूल अनुदान (योजनेतर) (३६०४०५०३)

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः बीजीटी -२०१५/प्र.क्र.४१/वित्त-३

बांधकाम भवन,मर्झबान रोड,
फोर्ट-१,मुंबई-४००००१.
तारीख: **१९ जानेवारी,२०१६.**

वाचा -

1. **शासन परिपत्रक क्रमांकः अर्थसं२०१५/प्र.क्र.८५/अर्थसंकल्प-३,दिनांक१७ एप्रिल,२०१५**
2. **शासन निर्णय क्रमांकः बीजीटी -२०१५/प्र.क्र.४१/वित्त-३, दिनांक -१४/५/२०१५.**
3. **शासन परिपत्रक क्रमांकः अर्थसं२०१५/प्र.क्र.८५/अर्थसंकल्प-३,दि.१२ जानेवारी,२०१६.**

शासन निर्णय:-

महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम १९६१ मधील कलम १८१(अ) अन्वये जिल्हा परिषदांना देय असलेले ७ टक्के वन महसूल अनुदान मंजूर करता यावे म्हणून सन २०१५-२०१६ या वित्तीय वर्षासाठी एकूण रुपये १६,११,४३,००० /- (रुपये सोळा कोटी अकरा लक्ष त्रेचाळीस हजार फक्त) इतकी तरतूद करण्यात आलेली आहे.

२. वित्त विभागाच्या परिपत्रक क्र. अर्थसं २०१५/प्र.क्र.८५/अर्थसंकल्प-३,दिनांक १७ एप्रिल,२०१५ अन्वये आवश्यक असणारा योजनेतर अर्थसंकल्पीत निधी ७०% च्या मर्यादेत वितरण करण्यास मान्यता दिली आहे.त्यानुसार सदर तरतुदीपैकी माहे एप्रिल २०१५ ते नोव्हेंबर २०१५ या आठ महिन्यांकरीता आवश्यक असणारा योजनेतर अर्थसंकल्पित निधी रु.११,२८,००,१००/-(रुपये अकरा कोटी अठ्ठावीस लक्ष शंभर फक्त) एवढी रक्कम मंजूर झाली आहे. सदर रक्कम सर्व जिल्हा परिषदांना वितरीत

करण्यासाठी प्रधान मुख्य वन संरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांच्याकडे संदर्भाधिन शासन निर्णय क्रमांक- बीजीटी -२०१५/प्र.क्र.४१/वित्त-३,दिनांक -१४/५/२०१५ व्दारे सुपूर्द करण्यात आली आहे.

३. आता वित्त विभाग परिपत्रक क्र. अर्थसं-२०१५/प्र.क्र.८५/अर्थसंकल्प-३, दि.१२ जानेवारी,२०१६ अन्वये अर्थसंकल्पीत निधी खर्च करण्याची मर्यादा ८५% एवढी विहीत करण्यांत आली आहे. त्यास अनुसरून उर्वरीत कालावधीसाठी ७ % वन महसूल रु.२,४१,७१,४५०/- (रुपये दोन कोटी एक्केचाळीस लक्ष एक्कात्तर हजार चारशे पन्नास फक्त) एवढे अनुदान आता वितरीत करण्यांत येत आहे. अशाप्रकारे आतापर्यंत ७% वन महसूल अनुदानाकरीता रु. १३,६९,७१,५५०/- (रुपये तेरा कोटी एकोणसाठ लक्ष एकात्तर हजार पाचशे पन्नास फक्त) वितरीत करण्यांत येत आहे.या शासन निर्णयान्वये मंजूर केलेली अनुदानाची रक्कम प्रधान मुख्य वन संरक्षक, महाराष्ट्र राज्य नागपूर यांनी सर्व जिल्हा परिषदांमध्ये वाटप करावयाची असून, वितरण आदेशाच्या प्रती शासनाकडे पाठवावयाच्या आहेत. जिल्हा परिषदांना शासन मंजूरी देईल, या अपेक्षेने मंजूर केलेल्या रकमेपेक्षा जास्त खर्च होणार नाही याची दक्षता घ्यावी.

४. जिल्हा परिषदांनी हे अनुदान संदर्भाधीन शासन निर्णयानुसार जंगल क्षेत्रामधील आदिवासींच्या विकासाकरीता आवश्यक वाटतील अशा योजनांवर व जंगल क्षेत्राच्या विकासासाठी असणा-या योजनांवर खर्च करावे आणि उपयोगिता प्रमाणपत्र प्रधान मुख्य वनसरंक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचेकडे पाठवावे. प्रधान मुख्य वन संरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी जिल्हा परिषदांना दिलेल्या वन महसूल अनुदानाच्या खर्चाच्या व जमेच्या रकमांचा ताळमेळ या विभागाच्या परिपत्रक क्र.आरसीएन १०८९/सीआर३०२७/२८, दिनांक ५ सप्टेंबर ९० अन्वये विहित केलेल्या कार्यप्रणाली प्रमाणे घालावा व त्याप्रमाणे आपली माहिती या विभागाकडे पाठवावी.

५. या बाबीवर होणारा खर्च मागणी क्र.एल-५" ३६०४ स्थानिक संस्था व पंचायत राज संस्था यांना नुकसान भरपाईच्या व अभिहस्तांकित रकमा देणे २००- इतर संकीर्ण व नुकसान भरपाईच्या अभिहस्ताकित रकमा देणे दत्तमत(०१)(१०) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ च्या कलम १८१(अ) अन्वये जिल्हा परिषदांना वन महसूल अनुदाने (योजनेतर) संकेतांक क्रमांक (३६०४०५०३) या अर्थसंकल्पीय शीर्षाखाली दाखवावा व सन २०१५-२०१६ या वित्तीय वर्षासाठी अधिनस्त ठेवलेल्या तरतूदीतून खर्ची टाकावा. हा शासन निर्णय मिळाल्याची कृपया पोच द्यावी.

६. हा शासन निर्णय वित्त विभागाचे परिपत्रक क्रमांक : अर्थसं-२०१५/ प्र.क्र-८५/ अर्थसंकल्प-३, दिनांक १२ जानेवारी, २०१६ अनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०११९१५३५३९८७२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Pandurang Rawaji Khotare

Digitally signed by Pandurang Rawaji Khotare
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Section Officer, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=241eb93ab449def8114b5fbff2ea51ab0f16e0092f0102aa9502d0457228dd65, cn=Pandurang Rawaji Khotare
Date: 2016.01.20 10:26:09 +05'30'

(पां.रा.खोटरे)
कार्यासन अधिकारी,महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. प्रधान मुख्य वन संरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर.
२. सर्व विभागीय आयुक्त.
३. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
४. अध्यक्ष, जिल्हा परिषदा. (सर्व)
५. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी.
६. वन संरक्षक अमरावती, ठाणे, नाशिक, पुणे, दक्षिण चंद्रपूर, उत्तर चंद्रपूर,नंदूरबार, यवतमाळ, औरंगाबाद, कोल्हापूर, नागपूर.
७. विभागीय वन अधिकारी,अमरावती,अकोला,बुलढाणा,यवतमाळ,नागपूर,वर्धा,भंडारा, गोंदिया,नांदेड,औरंगाबाद, जालना,परभणी, हिंगोली, सोलापूर, सावंतवाडी, पुणे, कोल्हापूर, सातारा,ठाणे, पश्चिम-नाशिक,उत्तर-धुळे, जळगांव, रायगड (अलिबाग), मध्ये बांदा, चंद्रपूर-सिरोंचा(इटटापल्ली) अहमदनगर यांना विनंती करण्यात येते की, प्रधान मुख्य वन संरक्षक, महाराष्ट्र राज्य नागपूर यांनी त्यांच्याकडे जिल्हा परिषदांना वाटपासाठी ७ % वन महसूल अनुदान सपूर्द केल्यानंतर त्वरित सदर अनुदान संबंधित जिल्हा परिषदांना मंजूर करावे.
८. उप विभागीय वन अधिकारी बीड, उस्मानाबाद, रत्नागिरी, सांगली.
९. महालेखापाल महाराष्ट्र -१ मुंबई. (लेखा परिक्षण)
१०.महालेखापाल महाराष्ट्र -२ नागपूर. (लेखा परिक्षण)
११.महालेखापाल महाराष्ट्र -१ मुंबई. (लेखा व अनुज्ञेयता)
१२.महालेखापाल महाराष्ट्र -२ नागपूर. (लेखा व अनुज्ञेयता)
१३.निवासी लेखा अधिकारी, लेखा व अधिदान कार्यालय, मुंबई
१४.मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा कोकण भवन, बेलापूर, नवी मुंबई,

१५.उपमुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, पुणे, औंरंगाबाद, नागपूर, अमरावती ,कोकण भवन (बेलापूर) व नाशिक

१६. महसूल व वन विभाग फ-९ मंत्रालय, मुंबई.

१७. वित्त विभाग.व्यय-१५, अर्थ-१६, मंत्रालय, मुंबई -३२.

१८. कार्यासन क्रमांक -वित्त-१, वित्त-७ , वित्त-८ ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२.

१९. निवड नस्ती , का.क्र. वित्त-३, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२.